MHJG120012852024

**कौ. हि. म. सं. अर्ज क्र.१५७/२०२४**
**कांचन चव्हाण वि. गणेश चव्हाण व इतर**

**<u>आदेश निशाणी क्र.५ वर</u>**

१) अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम २३ प्रमाणे प्रस्तुत कामी अंतरिम आदेश होवुन मिळणे करीता दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदार हिचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> –**

२) अर्जदाराचा सामनेवाला क्र.१ हा पती असून सामनेवाले क्र. २ व ३ हे सासरे व सासु असून सामनेवाला क्र. ४ हा दिर, सामनेवाले क्र.५ व ६ हे नणंद व नणंदोई तर सामनेवाला क्र. ७ हे आजे सासरे व सामनेवाले क्र. ८ व ९ हे मामे सासरे आहेत. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचे लग्न दि. २३.०६.२०२३ रोजी मौजे रांजणगांव, ता. चाळीसगांव, जि.जळगांव येथे हिंदू धर्म शास्त्र पध्दतीने झालेला आहे. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचे पती पत्नीचे नातेसंबंध अद्याप कायम आहेत व त्यांना सदर विवाह संबंधातून काही एक अपत्य झालेले नाही. सदरील लग्नाचा संपुर्ण खर्च अर्जदाराच्या आईवडीलांनी केला.

३) अर्जदार पुढे कथन करते की, लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाला क्र. १ कडे पिंप्री प्र.उ. (मोंढाळे) येथे नांदावयास गेली. अर्जदार हिस लग्नानंतर सुरुवातीला चार दिवस बरे वागविले. सामनेवाला क्र. १ हा पुणे येथे नोकरीला असल्याने सुट्टीच्या दिवशी पिंप्री येथे येत असे. त्यानंतर सामनेवाले क्र. १ ते ४ हे लग्नाचा विषय काढून अर्जदारास मानसिक त्रास देवू लागले. सामनेवाला क्र. १ हा सुट्टीच्या दिवशी घरी येत होता व अर्जदारास म्हणत होता की, 'मी पुण्याला नोकरीला आहे, मला पुण्यामध्ये फ्लॅट घ्यावयाचा आहे. त्यासाठी तु तुझ्या वडीलांकडून ५ लाख रुपये घेवून ये'. अर्जदाराच्या वडीलांनी लग्नात बरेच पैसे खर्च केल्याने व त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने त्यांची मागणी पुर्ण करता आली

नाही. त्याकारणावरुन सामनेवाला हा अर्जदार हिस मारहाण करुन रात्री अपरात्री घरातून हाकलून देत असे.

४) अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदार ही तिच्या माहेरी जायची तेव्हा सामनेवाले क्र. १ ते ४ यांच्या पासून होणाऱ्या शारिरीक व मानसिक त्रासाबाबत तिच्या आईवडीलांना कल्पना देत असे. परंतु ते अर्जदाराची समजुत काढत असे. सामनेवाले नं.५ ते ९ हे देखील अधून मधून सामनेवाला नं. १ चे घरी येवून अर्जदारास अपशब्द बोलून व टोचून बोलून तीला मानसिक त्रास देत असत. सामनेवाली नं.५ ही अर्जदारास म्हणायची की, "तुझे वडीलांनी माझे भावास लग्नात हुंडा दिला नाही. त्याला आता पुण्यामध्ये फ्लॅट घेण्यासाठी तुझे वडिलांकडून पैसे आणून दे, जावयाला मदत केली तर त्यात काय बिघडते?" सामनेवाले नं.५ ते ९ हे वरील नातेवाईक सामनेवाले नं. १ ते ४ यांना प्रोत्साहन देत असत.

५) अर्जदार पुढे कथन करते की, सामनेवाली नं.३ ही संशयी वृत्तीची असलेने अर्जदारावर नेहमी पाळत ठेवीत होती व सामनेवाला नं.१ यास फोनवर अर्जदारा विषयी खोट्या नाट्या तक्रारी सांगत व घरात अर्जदारास वाईट शिवीगाळ करुन तिचेवर दहशत बसवित होती. सामनेवाला नं. १ हा दि.१/३/२०२४ ते ३/३/२०२४ पावेतो सुट्टीच्या दिवशी पिंप्री येथे आला व दि.३/३/२०२४ रोजी अर्जदाराशी सामनेवाले नं. १ ते ४ यांनी जबरदस्त भांडण केले व दि.०४/३/२०२४ रोजी पुणे येथे कामावर निघून गेला. सामनेवाली क्र.३ ही अर्जदारास म्हणाली की, माझ्या मुलाच्या कंपनीतील एका मुलीशी त्याची ओळख परिचय आहे ती मुलगी माझ्या मुलाशी लग्न करण्यास तयार आहे, परंतु मी व माझे जावई माझे मुलास तसे करु देत नाही. त्यानंतर सामनेवाली क्र.३ हिने अर्जदाराच्या अंगावरील सर्व दागिने काढून घेतले व नेसत्या वस्त्रानिशी अर्जदाराला घरातुन हाकलून दिले. अर्जदार हिच्या घरच्यांनी सामनेवाले यांना समजविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी

नांदण्यास स्पष्ट नकार दिला व अर्जदारास वैवाहित सुखापासून वंचित रहावे लागत आहे. अर्जदार ही आजही सामनेवाला क्र. १ सोबत संसार करण्यास तयार आहे.

६) अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदार हिस सामनेवाला नं. १ ने दि.२६/६/२०२४ रोजीची रजिस्टर नोटीस पाठविली. सदरील नोटीसीस अर्जदार हिने दि.०४/०७/२०२४ रोजी नोटीस उत्तर पाठवून तीस नांदावयास घेऊन जावे याबाबत कळविले. नोटीस मिळूनही सामनेवाला नं.१ हा अथवा त्याचे कोणीही नातेवाईक अर्जदारास घेण्यास आले नाहीत व अर्जदाराचे अन्न, वस्त्र व परिरक्षणाची कोणतीही काळजी घेतली नाही म्हणून अर्जदारास सदरील अर्ज सामनेवालें विरुद्ध मे. कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे.

७) अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदारास घरकामा शिवाय कोणताही कामधंदा येत नाही व तीला उत्पन्नाचे काहीएक साधन नाही. अर्जदार ही स्वतःचा चरितार्थ चालवू शकत नाही. अर्जदारास तीचे उदरनिर्वाहासाठी दरमहा रुपये २५,०००/–प्रमाणे खर्च येतो. सा.वाला नं. १ हा टी ॲन्ड टीए इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे या कंपनीत सिव्हील इंजिनिअर म्हणून नोकरीस असून त्यापासून ५०,०००/– रुपये दरमहा पगार मिळतो. तसेच सामनेवाला नं.१ यास खाजगी बांधकाम व्यवसायातून दरमहा रुपये १ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. सामनेवाला नं.१ याचे एकत्र कुटूंबाची पिंप्री प्र.उ. (मोंढाळे) येथे ७ ते ८ एकर बागायती शेत जमीन असून त्यातून कपाशी, मका, गहु, हरभरा इ. पिके घेऊन वर्षाला २० लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला नं. १ याची गावात २ घरे व १ प्लॉट आहे. सामनेवाला नं. १ ची आर्थिक परिस्थिती चांगली आहे व अर्जदार हिस वरील प्रमाणे खावटी रक्कम देण्याची त्याची कायदेशिर व नैतिक जबाबदारी आहे. सामनेवाला नं.१ वर अर्जदारा शिवाय इतर कोणाचीही पालन पोषणाची जबाबदारी नाही.

८) अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदाराने दाखल केलेल्या मुळ अर्जाची चौकशी होऊन त्याचा अंतिम निकाल लागण्यास बराचसा कालावधी लागेल तो पावेतो अर्जदाराची उपासमार होईल. सामनेवाला नं.१ ची वर अर्ज कलम नं. १० यात नमुद केले प्रमाणे आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे अर्जदारास अंतरिम खावटी रक्कम रुपये १५ हजार प्रमाणे दरमहा देण्याची सामनेवाला नं. १ ची ऐपत आहे. अर्जदार हिचा अंतरिम खावटीचा अर्ज मंजुर करण्यात यावा ही नम्र विनंती.

९) सामनेवाला क्र. १ यांनी नि. क्र. २० वर आपले म्हणणे सादर करुन अर्जास हरकत घेतली आहे. सामनेवाला क्र. ३, ४, ७ ते ९ यांनी सामनेवाला क्र. १ तर्फे दाखल केलेले म्हणणे नि.क्र. २२ वरील पुरशीस अन्वये स्विकारले आहे. सामनेवाला क्र. २, ५ व ६ यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सामनेवाले यांचे म्हणणे असे आहे की, सामनेवाला क्र. १ चा विवाह अर्जदार हिच्यासोबत दि. २३.०६.२०२३ रोजी झालेला आहे. अर्जदाराने अर्जात केलेले कथन सामनेवाले यांनी नाकारले आहे. सामनेवाले यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला हा पुणे येथील टी ॲण्ड टी इंफ्रा लि. या कंपनीत सन २०२२ पासून कार्यरत आहे. अर्जदाराच्या नातेवाईकांनी अर्जदाराच्या बाबतीत वैद्यकीय, शारिरीक व शैक्षणिक परिस्थिती बिकट असून देखील परस्परांमध्ये विचारविनिमय करुन अर्जदाराच्या वडीलांच्या संबंधित राजेंद्र श्रावण पाटील व दत्तात्रय धोंडू पाटील यांनी अर्जदाराचा विवाह सामनेवाला सोबत करण्याचे ठरवले. त्यानंतर सामनेवाला क्र. १ च्या वडीलांशी अर्जदार हिच्या नातेवाईकांनी संपर्क साधून त्यांची दिशाभुल करण्याच्या उद्देशाने सामनेवालासाठी अर्जदाराचे स्थळ सुचवले. त्यानंतर सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिस बघण्यास गेला. त्याठिकाणी अर्जदारास काही प्रश्न विचारल्यानंतर तिच्या नातेवाईकांनी इकडच्या तिकडच्या चर्चा काढून मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम घाईत उरकवून टाकला

१०) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदाराकडील नातेवाईकांनी सामनेवाला क्र.१ च्या कुठल्याही नातेवाईकाला मध्यस्थी न करता अर्जदाराचे लग्न सामनेवाला क्र.१ सोबत फोन वर बोलणे करुन ठरवले. सामनेवाला क्र. १ यास अर्जदाराच्या शिक्षणबाबत शंका असून देखील त्याकडे दुर्लक्ष करुन सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराशी लग्न केले. लग्न झाल्यानंतर सामनेवाला क्र.१ याने मॅरेज सर्टिफिकेट बनविण्यासाठी अर्जदाराकडे तिच्या लिव्हींग सर्टिफिकेट ची मागणी केली असता तिचा शारिरीक समतोल बिघडला. त्यानंतर सामनेवाले यांनी अर्जदारास उपचाराकरीता दवाखान्यात दाखल करुन वैद्यकीय उपचार केला त्यावेळी तिचे लिव्हींग सर्टिफिकेट बघितल्यावर तिचे वय परिचय पत्रावर दाखवल्याप्रमाणे नसुन तब्बल २ वर्षांनी मोठया आहे असे लक्षात आले. त्यावेळी अर्जदाराकडे विचारणा केली असता तिने हे तिच्या मामा, काका व वडीलांनी केलेले असून तिला माहिती नाही असे सांगितले. अर्जदार हिचे शिक्षणाबाबत चौकशी केली असता ती बी.ई. ऑटोमोबाईल झाली नसल्याचे देखील त्यांच्या लक्षात आले. अर्जदारास थायरॉईडचा त्रास असल्याचे देखील तिच्या वैद्यकीय तपासादरम्यान सामनेवाला यांना समजले.

११) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदारास विसर पडणे, अचानक रडत असणे, शारिरीक समतोल बिघडणे, अवेळी झोपणे इ. प्रकार दिसत होते. म्हणून सामनेवाले यांनी अर्जदाराकडे विचारणा केली असता तिने तिला हा त्रास अगोदर पासून आहे व तो तिच्या घरच्यांनी सामनेवाला यांना सांगितला नाही का अशी त्यांच्याकडे विचारणा केली. त्यावेळी सामनेवाला यास त्याचा धक्का बसला. त्यामुळे सामनेवाले क्र.१ याची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. एकेदिवशी अर्जदार हिची अचानक तब्बेत बिघडल्यामुळे तिला उपचारासाठी दवाखान्यता नेण्यात आले. त्याठिकाणी अर्जदाराच्या माहेरच्या लोकांना बोलवून घेतले. सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदाराच्या घरच्यांना विचारपुस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व 'आमची मुलगी जशी आहे,

तशी आहे आता तुम्ही बघा' असे म्हटले. त्याठिकाणी सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराच्या थायरॉईडबाबत तिच्या माहेरच्या लोकांकडे विचारपुस केली असता त्यांनी सामनेवाले सोबत भांडण करुन अर्जदारास माहेरी रांजणगांव येथे घेवून गेले. सामनेवाला क्र. १ याची अर्जदार व अर्जदाराच्या संबंधित लोकांनी फसवणूक केली आहे. त्यामुळे सामनेवाला क्र. १ याने दि. २७.०६.२०२४ रोजी पारोळा येथील पोलीस स्टेशनला अर्जदार व तिच्या नातेवाईकांविरुध्द फिर्याद दाखल केली आहे. तसेच त्यांना वकीलांमार्फत दि. २६.०६.२०२४ रोजी नोटीस पाठवली आहे. अर्जदाराने सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे अंतरिम खावटीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**१२)** अर्जदार हिचे अर्जातील कथन, सामनेवाला यांचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे व अर्जदाराच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यावरुन प्रस्तुतच्या अर्जाच्या अनुषंगाने पुढील मुद्दे माझे समोर उपस्थित होत आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांना सामनेवाले यांचेकडुन कौटूंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत आहे काय ? | होय |
| २. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे सामनेवाला क्र.१ कडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशतः होय, दरमहा रु. ३,०००/- |
| ३. | काय आदेश ? | **अर्ज अंशतः मंजुर करणेत येतो.** |

**<u>कारणमीमांसा</u>**

**१३)** अर्जदार हिने आपल्या अर्जाच्या समर्थनार्थ सामनेवाले क्र. १ ने अर्जदारास पाठवलेल्या नोटीसची प्रत, नोटीस उत्तराची प्रत, पोस्टाची पावती व पोहोच पावती तसेच सामनेवाला क्र. २ यांच्या नावे असलेल्या जमिनीचे ७/१२ एकूण ३ उतारे दाखल केले आहे. अर्जदार हिने मा. सर्वोच्च न्यायालय यांचा **रजनिश – वि– नेहा, फौजदारी अपील क्र. ७३०/२०२०** मधील निर्देशानुसार मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्रं.७ वर सादर केले आहे. सामनेवाले यांना वेळोवेळी संधी देवून देखील त्यांनी मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र सादर केले नाही.

**१४)** अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.एस.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला यांना वेळोवेळी संधी देवून देखील त्यांनी युक्तीवाद केला नाही. करीता त्यांच्या विरुध्द युक्तीवाद नाहीचा आदेश पारीत करण्यात आला.

**<u>मुद्दे क्र.१ ते ३ बाबत :–</u>**

**१५)** महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ च्या कलम २० नुसार पिडीतग्रस्त महिलांना पोटगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तसेच कलम २३ नुसार कलम २० मधील पोटगी ही अर्ज दाखल झाल्यानंतर मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम स्वरुपात देण्याचा अधिकार देखील आहे. परंतु सदर पोटगी देण्यासाठी सामनेवालांनी अर्जदार हिचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार व सामनेवाला हे सहभागी निवासस्थानामध्ये राहत होते हे देखिल सकृतदर्शनी शाबीत होणे जरुरीचे आहे. सामनेवाला यांनी नातेसंबंध मान्य केलेले आहे. तसेच अर्जदार व सामनेवाला क्र. १ ते ४ हे सहभागी निवासस्थामध्ये एकत्र कुटूंबात राहत असल्याचे मान्य केलेले आहे. त्यावरुन अर्जदार व सामनेवाले हे सहभागी निवासस्थानामध्ये राहत होते व त्यांच्यामध्ये कौटूंबिक नाते संबंध असल्याचे सकृतदर्शनी शाबीत होते.

१६) अर्जदार हिने अर्जासोबत प्रतिज्ञापत्र देवुन लग्नानंतर ती सामनेवाला यांच्याकडे एकत्र कुटूंबात नांदण्यास गेली असता सामनेवाला यांनी तिला सुरुवातीचे काही दिवस चांगले नांदवले. परंतु त्यांनतर सामनेवाले हे तिचा मानसिक व शारिरीक छळ करीत असल्याचे कथन केले आहे. याउलट सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या शिक्षणाच्या बाबतीत शंका उपस्थित केली आहे. तसेच अर्जदार हिने तिची शैक्षणिक तसेच वैद्यकीय परिस्थितीची माहिती लपवली, वयाची चुकीची माहिती देवून सामनेवाले यांची फसवूणक केली आहे. असे अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केलेले आहेत.

१७) दोन्ही बाजुचे म्हणणे व विवाह संबंध यांचा विचार करता एक बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते की, अर्जदार व सामनेवाले यांचेमध्ये घरगुती नाते संबंध आहेत व उभयतांनी एकाच घरामध्ये काही काळ सहजीवन व्यथीत केलेले आहे. अर्जदाराने अर्जातील कथने शपथेवर सांगितलेली आहेत. सामनेवाले यांनी त्यांच्या जबाबात अर्जदाराने त्यांची फसवणूक केल्याचे कथन केले असले तरी त्यांच्यामधील नातेसंबंध मान्य केले आहे. अर्जदार ही तिच्या विवाहानंतर सामनेवाले यांच्याकडे राहत असल्याचे देखील सामनेवाले यांनी मान्य केले आहे. अर्जदाराने तिच्या कथनाला दुजोरा देण्यासाठी शपथपत्र अर्जासोबत दाखल केले आहे. अर्जातील कथनावरुन सकृतदर्शनी अर्जदार हिचा सामनेवाला क्र.१ याने सांभाळ केला नसल्याचे व उदरनिर्वाहाची सोय केली नसल्याचे दिसुन येते. यावरुन सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिचा आर्थिक छळ केल्याचे स्पष्ट होते. तसेच अर्जदार हिचे शपथपत्राने पुष्टी दिलेल्या अर्जातील कथनावरुन सकृतदर्शनी असे दिसुन येते की, सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिच्याकडे रक्कम रुपये ५ लाख रुपयांची मागणी केली. तसेच सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिचा शारीरीक व मानसिक छळ करीत होता. अर्जदार हिने शपथेवर कथन केले की, सामनेवाला क्र.२ ते ६ देखील अर्जदार हिचा शारीरीक व मानसिक छळ करीत होते व सामनेवाले हे संगनमत करुन अर्जदार हिच्याकडे बेकायदेशीर पैशांची मागणी करुन सतत अर्जदार हिस त्रास देत होते. सामनेवाले यांनी

अर्जदाराने व तिच्या माहेरील लोकांनी त्यांची फसवणूक केल्याचे कथन केले आहे. परंतु त्यास दुजोरा देणारा कोणताही कागदोपत्री दस्त अभिलेखावर दाखल केला नाही.

१८) अर्जदार यांचे सदर कथनावरुन सामनेवाला क्र.१ याने कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना अर्जदाराचा शारिरीक मानसिक छळ केला असुन तिचा त्याग केलेला आहे असे प्रथमदर्शनीय स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार हिला आर्थिकदृष्टया आधाराची गरज असून त्याबाबतची सर्व नैतिक जबाबदारी सामनेवाला क्र.१ याचीच आहे. सामनेवाले यांनी त्यांच्या जबाबात अर्जदारास तिच्या माहेरकडील लोक माहेरी घेवून गेले असल्याचे कथन केले असले तरी सामनेवाले क्र.१ याने अर्जदारास नांदण्यास परत येण्याबाबत काही एक कागदपत्रे अभिलेखावर दाखल केले नाही. तसेच अर्जदाराविरुध्द फसवणूक केल्याबाबत तक्रार दाखल केली हे दर्शविणारे देखील कागदपत्रे दाखल केले नाही.

१९) अर्जदार हिने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे व ती कमवित नसल्याचे आणि स्वतःची उपजिवीका भागविण्यास असमर्थ आहेत असे प्रस्तुत अर्जामध्ये शपथेवर सांगितलेले आहे. तसेच त्यांचे निशाणी क्र.७ कडील मालमत्ता व दायित्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदार यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे नमुद केलेले आहे. तसेच अर्जदार हिने निशाणी क्र.७ कडील मालमत्ता व दायित्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रावरुन तिला घर कामाशिवाय कोणताही कामधंदा येत नाही व तिला उत्पन्नाचे काही एक साधन नाही असे स्पष्ट होते. याउलट सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाचा खर्च करण्यास ती समर्थ असल्याबाबत काही एक कथन त्यांच्या जबाबात केलेले नाही. यावरुन अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे दिसून येते.

२०) एकंदर, नि.क्र.७ वरील अर्जदार हिने मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात सामनेवाला क्र.१ हा टी ॲन्ड टी इंफ्रा. लि. पुणे येथे नोकरी करतो. त्यापासून त्यास दरमहा

रु. ५०,०००/– पगार मिळतो असे कथन करते. सामनेवाला क्र. १ याने तो टी ॲन्ड टी इंफ्रा. लि. पुणे येथे नोकरी करीत असल्याची बाब मान्य केली आहे. यावरुन सामनेवाले हा आर्थिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रथमदर्शनीय दिसुन येते. अर्जदार हिने सामनेवाले क्र. १ याच्या वडीलांच्या नावे असलेल्या जमिनींचे ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदर उताऱ्याचे अवलोकन केले असता सामनेवाला क्र. १ याच्या वडीलांकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार ही कमवती व्यक्ती नाही. त्यामुळे अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे असे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.१ याचे नि.क्र.२० वरील म्हणणेवरुन सामनेवाला क्र.१ हा धडधाकट व कमवती व्यक्ती असुन त्यास निश्चीतच उदरनिर्वाहाचे व उत्पन्नाचे साधन आहे. त्यामुळे, अर्जदार हिस सांभाळण्याची व तिच्या पालन पोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र.१ याचीच आहे. परंतु अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ हा टी ॲन्ड टी इंफ्रा. लि. पुणे येथे दरमहा रु. ५०,०००/– कमवितो व त्यास बांधकाम व्यवसायातुन रक्कम रु. १,००,०००/– उत्पन्न मिळते तसेच त्याची गावात २ घरे व १ प्लॉट आहे हे दर्शविणारे कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाही. तसेच अर्जदार हिने तिला दरमहा रक्कम रु. २५,०००/– इतका खर्च उदरनिर्वाहासाठी येतो याबाबत सविस्तर माहिती अर्जात नमुद नसल्याचे दिसुन येते.

**२१)** अर्जदार यांचे कथनावरुन सामनेवाले यांनी अर्जदार यांचा शारिरिक व मानसिक छळ केलेला असल्याचे प्रथमदर्शनिय दिसुन येते. अर्जदार ही वैद्यकीय दृष्टया कमकुवत असून तिने सामनेवाले यांची फसवणूक केली हे दर्शविणारे कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच उपचाराबाबतचे कागदपत्र सामनेवाले यांनी अभिलेखावर दाखल केले नाही. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याची पत्नी असल्याने पती या नात्याने तिचा सांभाळ करणे व उदरनिर्वाहाची, औषधपाण्याची व्यवस्था करणे ही सामनेवाला क्र.१ याची नैतिक जबाबदारी आहे. सामनेवाला यांनी अर्जदार हिला कोणतेही पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे असे दर्शविणारा सबळ पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. असे असतांना अर्जदार

यांचेकडे उत्पन्नाचे कोणतेही पुरेसे साधन नसल्यामुळे तिला दैनंदिन जिवनातील जिवनावश्यक वस्तुंची सोय होणेसाठी अंतरिम पोटगी मिळणे आवश्यक आहे. सबब, सामनेवाला क्र.१ यांची पोटगी देण्याची ऐपत, सध्याच्या जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती, सध्याची महागाई व उभयंताचे राहणीमान, पालन पोषणासाठी लागणारा खर्च या सर्व बाबींचा सखोल विचार करता सामनेवाला क्र.१ कडुन अर्जदार हिस दरमहा रुपये ३,०००/– अंतरिम पोटगी मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, या सर्व नमुद कारणास्तव मी मुद्या क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन मुद्या क्र.२ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे. तसेच मुद्या क्र.३ चे निष्कर्षासाठी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

अ) अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

ब) सामनेवाला क्र.१ याने अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यंत अर्जदार हिस दरमहा रुपये ३,०००/– ( तीन हजार रुपये) अशी अंतरिम पोटगी द्यावी असे आदेश देणेत येत आहे.

क) अर्जाचा खर्च म्हणून सामनेवाला नं.१ याने अर्जदार हिस रु. १,०००/– द्यावेत.

ड) आदेशाची एक प्रत अर्जदार हिस निशुःल्क देण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात सांगुन घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRIYANKA KESHAVRAO KADAM
Date: 2026.05.20 17:51:55 +0530

(श्रीमती पी. के. कदम)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. ३) चाळीसगांव.

दिनांकः–२०/०५/२०२६